दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २२६ । बुधवार ३ जून २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २    https://epaper.dainkaakarshan.com    E-mail- dainikaakarshan@gmail.com    RNI NO. MAHMAR/2021/84322

## तोफखाना हद्दीत ६ ठिकाणी मटका अड्ड्यांवर छापे

**सपोनि माणिक चौधरी यांच्या पथकाची कारवाई । दीड लाखांच्या मुद्देमालासह १० आरोपी गजाआड**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत वेगवेगळ्या ६ मटका अड्ड्यांवर छापे टाकून पोलिसांनी एकूण १ लाख ४५ हजार ९७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, १० आरोपींना ताब्यात घेतले आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिलेल्या आदेशानुसार एमआयडीसी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांच्या पथकाने १ जून तोफखाना हद्दीत ही धडक कारवाई केली. या छाप्यात रोख रक्कम आणि जुगाराचे साहित्य असा एकूण १ लाख ४५ हजार ९७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सर्व १० आरोपींविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) प्रमाणे एकूण ६ गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांना पुढील कारवाईसाठी तोफखाना पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

### कारवाई झालेली ठिकाणे व आरोपींची नावे

बागडपट्टी रोड सद्गुरु ऑटो मागे – नरेश नागेश यनगुल (वय ४५, रा. तोफखाना) आणि दिनकर मच्छिंद्र दौंडकर (वय ४०, रा. तोफखाना). मंगलगेट – घनश्याम मोहनलाल परदेशी (वय ४२, रा. मंगलगेट) बागडपट्टी रोड (नवरंग व्यायामशाळेच्या मागे) – प्रदीप शंकर चिल्का (वय ४३, रा. शिवाजीनगर, कल्याण रोड) बागडपट्टी रोड (जगदंबा गॅरेज शेजारील शेड) – सतीश रामदास खेत्रे (वय ४२, रा. नालेगाव) आणि सतीश एकनाथ हिवाळे (वय ५१, रा. ख्रिस्त गल्ली) सर्जेपुरा चौक (बडे भोले फुटाणा दुकानामागे) – सचिन मधुकर राठोड (वय ४१, रा. भिंगार) आणि आकाश राजेंद्र कांबळे (वय २८, रा. बालिकाश्रम रोड). सर्जेपुरा चौक (प्रियदर्शनी कॉम्प्लेक्सच्या बाजूला) – प्रशांत मोहन खैरे (वय ४३, रा. बुरुडगाव) व सूरज श्रीराम शेटे (वय ४०, रा. आडते बाजार).

### पथकात यांचा सहभाग

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि माणिक चौधरी, सफौ राकेश खेडकर, पोहेकॉ राजू सुद्रीक, पोकॉ किशोर जाधव, नवनाथ दहिफळे, सुरज देशमुख आणि उमेश शेरकर यांच्या पथकाने केली.

## हमाल पंचायतची बदनामी करणाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करा

**जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन । संघटना व पतसंस्थेविरोधातील आरोप बिनबुडाचे; शासनाची दिशाभूल केल्याचा आरोप । अशोक सानप व किसन सानप यांच्याविरोधात फौजदारी कारवाईची मागणी; अहिल्यानगर जिल्हा हमाल पंचायत आक्रमक**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा हमाल पंचायत या नोंदणीकृत कामगार संघटनेची तसेच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची जाणीवपूर्वक बदनामी करणाऱ्या अशोक किसन सानप व किसन लिंबाजी सानप यांच्याविरोधात तात्काळ फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे. याबाबत संघटनेच्या वतीने सविस्तर निवेदन सादर करण्यात आले असून विविध गंभीर आरोपांबाबत प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी भूमिका संघटनेने घेतली आहे.

अहिल्यानगर जिल्हा हमाल पंचायत ही संघटना अहिल्यानगर शहरासह संपूर्ण जिल्ह्यातील हमाल, मापाडी, कष्टकरी व अंगमेहनती महिला कामगारांसाठी कार्यरत असून कामगारांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याचे काम संघटनेमार्फत केले जाते. याशिवाय शहरातील कामगार व त्यांच्या कुटुंबियांना शासनाच्या नियमानुसार श्रमिक हॉस्पिटलमार्फत वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. त्यामुळे संघटनेचे कार्य दीर्घकाळापासून कामगारांच्या हितासाठी सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

संघटनेशी संलग्न असलेली स्वर्गीय शंकरराव घुले माथाडी कामगारांची सहकारी पतसंस्था ही महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अंतर्गत नोंदणीकृत असून संस्थेच्या उद्दिष्टांनुसार सभासदांना विविध सुविधा पुरवित आहे. मात्र अशोक किसन सानप यांनी पतसंस्थेच्या कामकाजावर कोणताही ठोस पुरावा नसताना गंभीर स्वरूपाचे आरोप केले असून जिल्हा हमाल पंचायतच्या अध्यक्षांच्या दबावाखाली पतसंस्थेत गैरव्यवहार सुरू असल्याचा आरोप करून संस्थेची ■ पान ४ वर

## अवैध दारू विक्रेत्यांच्या १० जामीनदारांच्या सातबारावर प्रत्येकी एक लाखाचा बोजा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अवैध दारू विक्रीला चाप लावण्यासाठी राहुरी पोलिसांनी कडक पाऊल उचलले असून, दारूबंदी कायद्याचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या १० अवैध दारू विक्रेत्यांच्या जामीनदारांच्या सातबारा उताऱ्यावर प्रत्येकी १ लाख रुपयांचा शासन वसुलीचा बोजा चढविण्याचे आदेश २ जून रोजी पारित करण्यात आले आहेत. या धडक कारवाईमुळे गुन्हेगारांना पाठीशी घालणाऱ्या जामीनदारांचे धाबे दणाणले आहे.

ही कारवाई ■ पान ४ वर

### बाँडच्या अटींचे उल्लंघन नडले!

राहुरी पोलीस ठाणे हद्दीत सन २०२५ मध्ये दारूबंदी कायद्यांतर्गत २२१, तर सन २०२६ मध्ये मे अखेरपर्यंत १५४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या दीड वर्षांतील सराईत गुन्हेगारांविरुद्ध दारूबंदी अधिनियम कलम ९३ अन्वये १५५ प्रतिबंधात्मक प्रस्ताव श्रीरामपूर प्रांताधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आले होते. त्यापैकी १२१ प्रकरणांत प्रत्येकी १ लाख रुपयांचे बाँड लिहून घेण्यात आले होते. बाँड लिहून दिलेला असतानाही १० अवैध दारू विक्रेत्यांनी पुन्हा गुन्हे करत अटींचा भंग केला. राहुरी पोलिसांनी याबाबतचा अहवाल सादर केल्यानंतर, प्रांताधिकाऱ्यांनी संबंधित आरोपींना प्रत्येकी १ लाख रुपयांचा दंड ठोठावला. मात्र, दंडाची रक्कम न भरल्यामुळे अखेर त्यांच्या जामीनदारांच्या सातबारा उताऱ्यावर शासन वसुलीचा बोजा चढविण्याचे आदेश देण्यात आले.

### पोलिसांचे नागरिकांना आवाहन

''नागरिकांनी कोणत्याही आरोपीस जामीन देताना विचारपूर्वक निर्णय घ्यावा. आरोपीने जामिनाच्या अटी मोडल्यास, त्याची आर्थिक आणि कायदेशीर जबाबदारी जामीनदारावर येऊन मालमत्तेवर जप्ती किंवा बोजा चढू शकतो,'' असे आवाहन राहुरी पोलिसांनी केले आहे.

## पैठणमध्ये १७ वर्षीय युवकाचा खून; नगरसेवकासह तिघांविरुद्ध अ‍ॅट्रॉसिटीसह गुन्हा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पैठण– शहरातील इंदिरानगर परिसरात झालेल्या किरकोळ वादाचे पर्यवसान १७ वर्षीय युवकाच्या खुनात झाल्याची धक्कादायक घटना सोमवारी (दि. २) रात्री घडली. या प्रकरणी एका विद्यमान नगरसेवकासह तिघांविरुद्ध खून व अनुसूचित जाती–जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनमोल देविदास आहिरे (वय १७, रा. इंदिरानगर, पैठण) असे मृत युवकाचे नाव आहे. याप्रकरणी त्याचे वडील देविदास शशिकांत आहिरे (वय ४६) यांनी पैठण पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.



मयत    आरोपी

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २ जून रोजी रात्री सुमारे सव्वा आठ वाजेच्या सुमारास इंदिरानगर येथील रेणुका अपार्टमेंटसमोर ही घटना घडली. फिर्यादीनुसार, विकास पाडुरंग पवार, ईश्वर भाऊसाहेब दगडे आणि साईनाथ विकास पवार या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींपैकी ईश्वर दगडे हे शिंदे गटाचे विद्यमान नगरसेवक असल्याची माहिती समोर आली आहे.

फिर्यादी व आरोपी हे एकाच परिसरात राहत असून आरोपींना फिर्यादीची जात माहिती असतानाही जातीवाचक शिवीगाळ करण्यात आल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. त्यानंतर अनमोल आहिरे आणि साईनाथ पवार यांच्यात झालेल्या भांडणाच्या कारणावरून साईनाथ पवार याने परिसरात लपवून ठेवलेला चाकू आणून ■ पान ४ वर

## वेदमूर्ती देवव्रत रेखे यांना पुण्याचा ब्राह्मणभूषण पुरस्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** 'आम्ही सारे ब्राह्मण' व 'ब्राह्मण व्यावसायिक पत्रिका'पुणे या नियतकालिकांच्या वर्धापनदिनी दि. १९ जून २०२६ रोजी, टिळक स्मारक मंदिर, पुणे येथे संध्याकाळी ५.३० वाजता पुरस्कार प्रदान समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न होत असून, यामध्ये वेदमूर्ती देवव्रत रेखे यांना यंदाचा 'ब्राह्मण भूषण' पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. मानपत्र, पुणेरी पगडी आणि भेटवस्तू असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

काशी येथे शुक्ल यजुर्वेदातील सुमारे २००० मंत्रांचे अत्यंत दुर्मिळ 'दण्डक्रम पारायण' ५० दिवसांत पूर्ण करून इतिहास रचणारे १९ वर्षीय वेदमूर्ती देवव्रत महेश रेखे यांना यंदाचा 'ब्राह्मण भूषण' पुरस्कार देण्यात येत आहे. देवव्रत रेखे यांच्या या ऐतिहासिक कामगिरीनंतर अनेक मोठे विद्वान आश्चर्यचकित झाले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या तरुण वेदमूर्तींचे अभिनंदन केले आहे. यंदाचा इंदुमती–वसंत करिअर भूषण पुरस्कार माध्यम तज्ज्ञ, व्याख्याते व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नवउद्योजक विनायक पाचलग यांना जाहीर झाला आहे. रोख रुपये १० हजार व स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

डॉ. रामचंद्र देखणे स्मृती कीर्तनकार पुरस्कार नव्याने सुरू केला आहे. यंदाचा युवा कीर्तनकार पुरस्कार ह.भ.प. अमृता कळंबेळकर यांना जाहीर झाला आहे. रोख रुपये ५ हजार व स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप राहणार आहे.

तसेच ब्राह्मण समाजासाठी प्रदीर्घ काळ काम करणार्या संस्थेला 'भगवान परशुराम ब्राह्मण संस्था पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येत आहे. यावर्षीचा पुरस्कार 'कर्हाडे ब्राह्मण संघ, पुणे' या संस्थेला ९६ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल देण्यात येणार आहे. रोख रुपये ५ हजार व स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप राहणार आहे.

यापूर्वी ब्राह्मण भूषण पुरस्काराने ■ पान ४ वर



## दै. आकर्षण निवडक

### वेदांत वैभव देशमाने याचे ‘जेईई ॲडव्हान्स्ड’ परीक्षेत यश!



अहिल्यानगर - देशातील अत्यंत प्रतिष्ठेच्या आणि कठीण मानल्या जाणाऱ्या ‘जेईई ॲडव्हान्स्ड २०२६’ (२०२६) या परीक्षेचा निकाल नुकताच घोषित झाला आहे. यामध्ये वेदांत वैभव देशमाने (  ) या विद्यार्थ्याने घवघवीत यश संपादन केले आहे. त्याने संपूर्ण देशात ६२६ वा ऑल इंडिया रँक ( ६२६) पटकावून आपल्या कुटुंबाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या उत्कृष्ट रँकमुळे देशातील आघाडीच्या नामांकित आयआयटी () कॉलेजमध्ये त्याची निवड निश्चित झाली आहे. वेदांतने हे उज्वल यश आजोबा कै. सुहास अनंत देशपांडे यांना खऱ्या अर्थाने एक भावपूर्ण श्रद्धांजली म्हणून समर्पित आहे. अत्यंत चिकाटी, नियमित अभ्यास आणि कठोर परिश्रम यांच्या बळावर हे यश मिळवल्याचे त्याने सांगितले. वेदांतने मिळवलेल्या या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, कौटुंबिक मित्र व नातेवाईकांकडून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### बाबुर्डी घुमट शिंदे मळ्यातील शेतकऱ्यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव




अहिल्यानगर - अहिल्यानगर तालुक्यातील बाबुर्डी घुमट येथील शिंदे मळा परिसरातील शेतकऱ्यांनी शेतात ये-जा करण्यासाठी कायमस्वरूपी रस्ता उपलब्ध करून देण्याची मागणी करत जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून रस्त्याअभावी शेतीची कामे करताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.यावेळी गोरख जाधव, कांताबाई जाधव, दिनेश निकाळजे, प्रिया निकाळजे, सुनील कांबळे, दानियल तिजोरे, संगीता तिजोरे यांच्यासह परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते.शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बाबुर्डी घुमट येथील गट क्रमांक २७९ मधील जमीन दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेअंतर्गत ७ लाभार्थ्यांना सन २००७ मध्ये वाटप करण्यात आली होती. मात्र, जमीन मिळून जवळपास दोन दशके उलटूनही संबंधित शेतजमिनीपर्यंत जाण्यासाठी कोणताही अधिकृत रस्ता उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. त्यामुळे शेतीची मशागत, पिकांची वाहतूक तसेच दैनंदिन शेतीकामे करताना मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे शेतरस्ता उपलब्ध करून देण्याची मागणी वारंवार केली असूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे प्रशासनाने येत्या एका महिन्याच्या आत शेतकऱ्यांच्या शेतात ये-जा करण्यासाठी रस्ता उपलब्ध करून द्यावा, अन्यथा सर्व लाभार्थी व शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसतील, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# जलसंपदा कार्यालयांच्या स्थलांतराच्या निर्णयावर उच्च न्यायालयाचे शिक्कामोर्तब

## शेतकरी, लोकप्रतिनिधींकडून निर्णयाचे स्वागत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अंतर्गत असलेल्या कार्यालय स्थलांतराच्या निर्णयाविरोधात छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली याचिका फेटाळण्यात आली असून, जलसंपदा विभागाच्या धोरणात्मक निर्णयावर उच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे.


शेतकरी हित डोळ्यासमोर ठेवून कृष्णा व गोदावरी पाटबंधारे महामंडळाने प्रदेश, मंडळ आणि विभाग स्तरावरील कार्यालयांच्या पुनर्रचनेचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला होता. सिंचन प्रशासन गतिमान आणि लोकाभिमुख व्हावे, तसेच या निर्णयाचा लाभ शेतकरी, नागरिक आणि लोकप्रतिनिधींना व्हावा, हीच यामागची भूमिका होती. सिंचनविषयक कामांसाठी लोकप्रतिनिधी, शेतकरी व नागरिकांना कार्यालये जवळ तसेच धरण लाभक्षेत्रात असावीत, या उद्देशाने महामंडळाच्या २७ मे २०२६ रोजीच्या बैठकीत हा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला होता. मात्र, जलसंपदा विभागाच्या निर्णयाविरोधात रौफ नवजा पटेल यांनी संभाजीनगर उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी होऊन न्यायालयाने सदर याचिका खारीज केली आहे.

आजच्या न्यायालयाच्या सुनावणीदरम्यान माननीय न्यायालयाने पक्षकाराला ‘‘सदरचे काम हे प्रशासकीय आहे, मात्र समाजमाध्यमांतून प्रसारित झालेली कागदपत्रे घेऊन न्यायालयात याचिका दाखल केली आहे‘‘, असे म्हटले. तसेच सदरचे प्रकरण दाखल करताना पक्षकाराने कोणताही अभ्यास किंवा कागदपत्रांचे संशोधन केलेले नाही, असे अभिप्राय नोंदवले. याचसोबत, ‘‘विभागाच्या मंत्र्यांना प्रतिवादी का केले?‘‘ असा प्रश्नही केला. सदर याचिकेचे कामकाज चालू ठेवण्यासाठी २० लाख रुपये भरावे किंवा याचिका मागे घ्यावी, असे निर्देश न्यायालयाने दिले आणि यासाठी १५ मिनिटांचा कालावधी दिला होता. त्यावर पक्षकाराने याचिका मागे घेत असल्याचे न्यायालयासमोर सांगितले.

कार्यालय स्थलांतर करण्याचा महामंडळाचा निर्णय असून, राज्यातील नदीजोड प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी तसेच जलसंपदा विभागाच्या योजनांच्या व निर्णयांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी घेतलेला हा धोरणात्मक निर्णय असल्याचे निरीक्षण न्यायालयाने याचिका फेटाळताना नोंदवले. राज्य सरकारच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ जी. पी. गिरासे, गोदावरी पाटबंधारे महामंडळाच्या वतीने सीनियर कौन्सिल विनायक होन आणि विधिज्ञ सुभाष तांबे यांनी बाजू मांडली. महामंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या निर्णयाची अंमलबजावणी १ जूनपासून सुरू झाली आहे. अनेक वरिष्ठ अधिकारी त्यांच्या नेमणुकीच्या कार्यालयांत हजर झाले. मात्र, तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनांच्या वतीने विभागाच्या निर्णयाविरोधात आंदोलने सुरू करण्यात आली होती.

आजच्या न्यायालयाच्या निर्णयामुळे आता सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्या नेमणुकीच्या ठिकाणी हजर होणे क्रमप्राप्त होणार आहे. दीर्घकाळापासून जलसंपदा विभागाचे निर्णय धरण लाभक्षेत्रापासून दूरवर असलेल्या कार्यालयांतून होत होते. लाभक्षेत्रातील लोकप्रतिनिधी, शेतकरी, अभियंते आणि कर्मचारी यांनाही कामकाजाकरिता अनेक जिल्ह्यांचा प्रवास करून जावे लागत होते. निर्णय आणि अंमलबजावणी यामध्ये लागणारा विलंब कमी करण्यासाठी जलसंपदा विभागाने कार्यालय स्थलांतराचा निर्णय घेतला आहे. नैसर्गिक आव्हानांच्या पार्श्वभूमीवर क्षेत्रीय स्तरावर सक्षम प्रशासन उभे करण्याच्या दृष्टीने जलसंपदा विभागाचा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात असून त्याचे सर्वत्र स्वागत होत आहे. आजच्या न्यायालयाच्या निर्णयामुळे आता त्यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

## जगताप यांच्या सौरऊर्जा प्लेटचे नुकसान; गुन्हा दाखल



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार–** पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार येथिल रहवाशी शेतकरी गणपत देवराव जगताप लाभार्थी क्रमांक –४४२०८००२६५१९० यांना मागेल त्याला सौरऊर्जा पंप योजने अंर्तगत ७.५ एचपी नुकताच विहीरीवर बसवण्यात आला असुन अज्ञात व्यक्तीने दगड मारून एक सौरऊर्जा सोलर प्लेट फोडली सदर घटना गुरुवार दि.२८ मे २०२६ रोजी निदर्शनास आली चालु सौरऊर्जा पंप बंद होण्याच्या अवस्थेत आला आहे पावसाळ्याचे दिवस जवळ आले आहेत सौरऊर्जा प्लेटची काच फुटल्याने प्लेट मध्ये पाणी जाऊन शॉर्टसर्किट होण्याची भिती निर्माण झाली आहे सदर पंप स्पॅन कंपनीचा असुन देखभाल दुरुस्ती विमा संवरंक्षण पाच वर्ष आहे स्पॅन सोलर पंप कंपनीचे समन्वयक अक्षय अंदुरे यांना कल्पना दिली असुन पाथर्डी पोलीस स्टेशन मध्ये अज्ञात व्यक्ती विरोधात कलम ३२४/२ अनन्वे सदर गुन्हा सतिष गणपत जगताप यांनी नोंदवला आहे पुढील तपास ठाणे अमंलदार राजेंद्र म्हस्के करत आहेत

## भिंगार अर्बन बँकेकडून नवनिर्वाचित आमदार अक्षय कर्डिले यांचा सत्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भिंगार अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या वतीने नवनिर्वाचित आमदार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. राजकीय, सामाजिक, सहकार, शैक्षणिक तसेच व्यापारी क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला . यावेळी आमदार कर्डिले यांचे शाल, श्रीफळ, पुष्पहार व सन्मानचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बँकेचे चेअरमन अनिलराव झोडगे होते. प्रारंभी दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आमदार कर्डिले यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना आमदार अक्षय कर्डिले म्हणाले की, ‘‘मतदारसंघातील जनतेने माझ्यावर दाखविलेला विश्वास ही केवळ निवडणुकीतील विजयाची बाब नसून ती माझ्यासाठी मोठी जबाबदारी आहे. ग्रामीण भागातील रस्ते, पिण्याच्या पाण्याच्या योजना, शिक्षण, आरोग्य सुविधा, युवकांसाठी रोजगारनिर्मिती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देत विकासकामांना गती देण्यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहणार आहे. विकासाचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला पाहिजे, हा माझा ठाम विश्वास आहे.’’

पुढे ते म्हणाले, ‘‘सहकार क्षेत्र हे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचे बळ आहे. भिंगार अर्बन बँकेसारख्या संस्था सामान्य नागरिक, शेतकरी, छोटे व्यापारी आणि उद्योजकांना आर्थिक आधार देण्याचे महत्त्वाचे काम करत आहेत. ग्रामीण व शहरी भागातील आर्थिक व्यवहार अधिक सक्षम करण्यासाठी सहकार संस्थांनी आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारत लोकाभिमुख भूमिका कायम ठेवली पाहिजे. जनतेच्या अपेक्षा पूर्ण करताना पारदर्शकता, विकास आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन यांना प्राधान्य देण्याचा माझा प्रयत्न राहील.’’

त्यांनी पुढे सांगितले की, ‘‘आज युवकांमध्ये मोठी क्षमता आहे. योग्य मार्गदर्शन, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्यास तरुणाई राज्याच्या प्रगतीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकते.

## माजी सैनिक युनूस टेंगे यांची शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या अहिल्यानगर अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुखपदी निवड

### अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुख पदी युनूस टेंगे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या शिर्डी येथे आयोजित जिल्हास्तरीय मेळाव्यात माजी सैनिक युनूस टेंगे यांची अहिल्यानगर जिल्हा अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली. पक्षाचे नेते व खासदार संजय राऊत यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

शिर्डी येथे झालेल्या या मेळाव्यास विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी खासदार चंद्रकांत खैरे, आमदार सुनील शिंदे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, शिवसैनिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. अहिल्यानगर जिल्हा शिवसेनाप्रमुख राजेंद्र दळवी यांच्या शिफारशीनुसार युनूस टेंगे यांची अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली.

युनूस टेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक माजी सैनिकांनी यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश केला. यामध्ये माजी सैनिक शेख अकबर, संदीप काकडे, राजमोहम्मद शेख, साजिद हवलदार, दिनकर गायकवाड, कृष्णा खेडकर यांच्यासह अनेक माजी सैनिक उपस्थित होते.

युनूस टेंगे हे सर्वधर्म समभावाची जपणूक करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची वेगळी ओळख आहे. समाजातील वंचित, गरजू तसेच माजी सैनिकांच्या विविध प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुखपदाची जबाबदारी सोपविल्याचे जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी यांनी सांगितले.

नियुक्तीनंतर बोलताना युनूस टेंगे म्हणाले, ‘‘शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने सर्वसामान्य नागरिक आणि माजी सैनिकांच्या अनेक प्रश्नांना न्याय मिळवून दिला आहे. पक्षाने माझ्यावर दाखविलेला विश्वास सार्थ ठरवत अल्पसंख्यांक समाज, माजी सैनिक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी मी सातत्याने काम करेल असे ते म्हणाले.

## नेप्ती ग्रामस्थांच्या वतीने संघर्षातून मुंबई पोलीस पोलीस पदी निवड झाल्याबद्दल अरबाज सय्यद यांचा सत्कार करून सन्मान

### नेप्ती गावाचा अरबाजने सन्मान वाढवला – प्रा. एकनाथ होले



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील नेप्ती येथील अत्यंत सामान्य आणि गरीब कुटुंबातील अरबाज जमीर सय्यद यांची मुंबई पोलीस पदी निवड झाल्याने संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची असतानाही मिळेल ते काम करत शिक्षण पूर्ण करून अरबाज यांनी मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर हे यश संपादन केले. त्यांच्या या यशामुळे आई-वडिलांसह संपूर्ण नेप्ती गावाचा सन्मान वाढला असून ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करून गौरव करण्यात आला. पेढे वाटून फटाक्यांच्या आतषबाजीत ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी चेअरमन वसंत पवार होते. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने प्राध्यापक एकनाथ होले सर यांच्या हस्ते अरबाज सय्यद यांचा सत्कार करून सन्मान करण्यात आला . कार्यक्रमास माजी उपसरपंच फारुक सय्यद, सरपंच संजय अशोक जपकर, माजी सरपंच संजय आसाराम जपकर, समता परिषदेचे नेते रामदास फुले, माजी उपसरपंच दादू चौगुले, जालिंदर शिंदे, जिल्हा नियोजन समिती सदस्य शिवाजी होळकर, माजी चेअरमन वसंत पवार, पोलीस पाटील अरुण होले, ग्रामपंचायत सदस्य बंडू जपकर, अतुल जपकर, प्राध्यापक बाबूलाल सय्यद, जमीर सय्यद, जावेद सय्यद, मोबीन सय्यद, सोन्याबापू कानडे, बाळासाहेब जपकर , रफिक सय्यद नाले हैदर यंग पार्टी व दोस्ती तरुण मंडळाचे कार्यकर्ते व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी अरबाज सय्यद यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या पुढील सेवेस शुभेच्छा दिल्या.

‘‘आजच्या स्पर्धेच्या युगात ग्रामीण भागातील युवकांनी परिस्थितीला दोष न देता शिक्षण आणि मेहनतीच्या जोरावर पुढे जाण्याची गरज आहे. अरबाज सय्यद यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून संघर्ष करत मुंबई पोलीस दलात स्थान मिळवले आहे. हे यश केवळ त्यांच्या कुटुंबाचे नसून संपूर्ण नेप्ती गावासाठी अभिमानाची बाब आहे.’’ त्यांनी युवकांना मोबाईल आणि व्यसनांच्या आहारी न जाता ध्येय निश्चित करून सातत्याने परिश्रम घेण्याचे आवाहन केले. गरीबी अडथळा नसून जिद्द आणि शिक्षण हे खरे सामर्थ्य आहे. नेप्ती गावाचा अरबाजने सन्मान वाढवला असे प्रतिपादन प्राध्यापक एकनाथ होले सर यांनी केले.

पुढे प्रा. होले म्हणाले, ‘‘गरीबी ही कधीच यशाच्या आड येत नाही. आई-वडिलांचे कष्ट, घरातील संस्कार आणि स्वतःची जिद्द असेल तर कोणतेही ध्येय गाठता येते. अरबाज यांनी मिळेल ते काम करून शिक्षण घेतले आणि आज पोलीस दलात निवड होऊन त्यांनी समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. अशा युवकांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळणार असून भविष्यात आणखी अनेक तरुण स्पर्धा परीक्षांकडे वळतील,’’ असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गावातील युवकांनी अरबाज सय्यद यांच्या संघर्षातून प्रेरणा घ्यावी. आज अनेक तरुण परिस्थितीसमोर हार मानतात; मात्र अरबाज यांनी संकटांवर मात करत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. समाजातील प्रत्येक घटकाने अशा होतकरू विद्यार्थ्यांना मदत केली तर ग्रामीण भागातून अनेक अधिकारी आणि कर्मचारी घडू शकतात. युवकांनी शिक्षण, शिस्त आणि सामाजिक जबाबदारी यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.’’

## तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शिक्षणातून मुला-मुलींचे भविष्य घडत असते. हे शिक्षण घेत असतांना विद्यार्थ्यांबरोबरच पालकांनाही अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. मुलांना शिक्षण घेतांना अडचणी येऊ नये यासाठी तिळवण तेली समाज ट्रस्टने नेहमीच मदतीचा हात दिला आहे. उच्च शिक्षणासाठी ट्रस्ट सहाय्य करत असते. यंदाच्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच विद्यार्थ्यांना ट्रस्टच्यावतीने वह्याचे वाटप करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनीही चांगला अभ्यास करुन आपल्या कुटूंबाचे व समाजाचे नाव उज्वल करावे. मुलांचे उज्वल भविष्यासाठी ट्रस्टचा नेहमीच पुढाकार राहिला आहे, असे प्रतिपादन तिळवण तेली समाज ट्रस्टच्या अध्यक्षा सौ.निता लोखंडे यांनी केले. तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने संत शिरोमणी संताजी महाराज शैक्षणिक योजने अंतर्गत समाजातील इ.१ ली ते इ. १२ वी तील सर्व विद्यार्थ्यांना दरवर्षीप्रमाणे मोफत वह्या वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी ट्रस्टच्या अध्यक्षा सौ.निता लोखंडे, उपाध्यक्ष शोभना धारक ,सचिव शशिकांत देवकर, विश्वस्त प्रसाद शिंदे, मनोज क्षिरसागर, दत्तात्रय डोळसे,प्रकाश सैंदर, सागर काळे, गोकूळ कोटकर,वैभव शिंदे ,सुरेश देवकर आदि उपस्थित होते.

याप्रसंगी प्रसाद शिंदे म्हणाले तिळवण तेली ट्रस्टच्यावतीने दरवर्षी इ.१ ली ते १२ वी मधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येत असते. यंदाही विद्यार्थ्यांना वह्या वाटपाचा शुभारंभ नुकताच झाला असून, दि. ७ जून पर्यंत हा उपक्रम सुरु राहणार आहे. विद्यार्थांनी गुणपत्रक, आधार कार्डची झेरॉक्स जमा करुन आपल्या वह्या दाळ मंडई येथील ट्रस्टच्या कार्यायातून दु.३ ते ४ या वेळेत घेऊन जाव्यात, असे आवाहन केले.

जेष्ठ नागरिक सुरेश देवकर म्हणाले की, तिळवण तेली समाजाच्यावतीने वर्षभर विविध समाजपयोगी उपक्रम राबविले जातात. त्यांचे काम अतिशय उकृष्ठ असे असून आम्ही जेष्ठ म्हणून त्यांना सदैव मार्गदर्शन करत असतो, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोज क्षिरसागर यांनी केले.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)


## दै. आकर्षण निवडक

### देहेरे येथे रिपाईच्या युवक तालुकाध्यक्षावर जीवघेणा हल्ला



अहिल्यानगर - नगर तालुक्यातील देहेरे गावात दोन गटांमध्ये सुरू असलेल्या वादाकडे पाहण्यासाठी गेलेल्या एका युवकावर नऊ जणांच्या टोळक्याने कोयते आणि बेसबॉलच्या दांडक्यांनी जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेले रिपब्लिकन पक्षाचे युवक नगर तालुकाध्यक्ष जयराम सुरेश आंग्रे यांच्यावर सध्या अहिल्यानगर येथील शासकीय जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून, हल्लेखोरांविरुद्ध तातडीने गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. जखमी जयराम आंग्रे यांनी सांगितलेल्या माहितीनुसार, सोमवारी (दि. १ जून) रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास देहेरे गावात दोन गटांमध्ये वाद सुरू होता. यावेळी चौकात बसलेल्या जयराम आंग्रे यांना मोठा गोंधळ आणि आरडाओरडा ऐकू आल्याने ते नेमके काय घडत आहे हे पाहण्यासाठी घटनास्थळाच्या दिशेने गेले. त्यांच्यासोबत त्यांचे मित्र अजय रोकडे हे देखील होते. अंगणवाडीसमोर पोहोचताच एका गटातील सात ते आठ जणांचे टोळके अचानक त्यांच्या अंगावर धावून आले. सुरू असलेल्या भांडणाशी आपला कोणताही संबंध नसल्याचे सांगूनही संबंधितांनी त्यांच्यावर हल्ला चढविला. हल्लेखोरांनी हातातील कोयते आणि बेसबॉलच्या दांडक्यांनी बेछूट मारहाण केल्याचा आरोप आंग्रे यांनी केला आहे. या हल्ल्यात त्यांच्या पाठीवर, डोक्यावर आणि शरीराच्या विविध भागांवर गंभीर दुखापती झाल्या. कोयत्याने वार करण्यात आल्याने तसेच दांडक्यांनी मारहाण केल्याने ते गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने त्यांना तातडीने उपचारासाठी अहिल्यानगर शासकीय जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.या घटनेची माहिती नगर तालुका पोलीस ठाण्यात देण्यात आली असून पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, हल्लेखोरांपैकी काही जण खासदाराचे कार्यकर्ते असल्याने पोलिसांवर दबाव टाकला जात असल्याचा आरोप जखमी युवकाने केला आहे. या प्रकरणातील आरोपींवर तातडीने गुन्हे दाखल करून अटक करण्यात यावी, अशी मागणी जयराम आंग्रे यांनी केली आहे. तसेच, जर आरोपींवर कारवाई करण्यात आली नाही, तर जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

### डोंगरे यांचा 'महाराष्ट्र नायक' राज्यस्तरीय पुरस्काराने गौरव



अहिल्यानगर - बी.एस.एफ. बहुद्देशीय संस्था व सत् कबीर बहुद्देशीय संस्थेच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांना ''महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कार'' प्रदान करण्यात आला. नाशिक रोड येथे झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात हृद्यरोग तज्ञ डॉ. अनिरुध्द धर्माधिकारी व मॉडेल रितिका साळुंखे यांच्या हस्ते डोंगरे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी मुख्य आयोजक भूषण सरदार, मॉडेल स्मिता माटेकर, अभिनेते डॉ. गणेश व्यवहारे, लेखिका अश्विनी सांगळे, वैशाली सोनवणे, राजेंद्र हेलोडे आदी उपस्थित होते. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तसेच ग्रामपंचायत सदस्य म्हणून कार्यरत असलेले पै. नाना डोंगरे यांनी नगर तालुक्यासह जिल्हाभर विविध सामाजिक उपक्रमांद्वारे आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. ग्रामीण भागात सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, साहित्य आणि धार्मिक क्षेत्रात त्यांनी सातत्यपूर्ण व प्रभावी कार्य उभारले आहे. संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील जनतेमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यासाठी अनेक विधायक उपक्रम राबविण्यात आले आहेत. पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन मोहिमा, स्त्री जन्माचे स्वागत, स्वच्छता अभियान, महिला सक्षमीकरण, मतदार जनजागृती, जलसंधारण जनजागृती, रक्तदान शिबिरे अशा विविध सामाजिक उपक्रमांद्वारे त्यांनी समाजामध्ये सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न केला आहे. युवकांमध्ये व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. तसेच गावपातळीवर आरोग्य शिबिरांचे आयोजन करून ग्रामीण नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचे कार्यही सातत्याने सुरू आहे.

# कृत्रिम दंत प्रत्यरोपण अभ्यासक्रम यशस्वी – डॉ. पायल धूत



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** भारती विद्यापीठ पुणे अंतर्गत स्वीटझरलँड येथील नोबल बायोकेअर संस्थेद्वारे आयोजित अभ्यासक्रम यशस्वी रित्या पूर्ण केला देशातून काही निवडक दंत रोपण तज्ञानी यामध्ये भाग घेतला होता.

साईदीपसहायद्री हॉस्पिटल येथे दंत विकार तज्ञ म्हणून गेली ७ वर्ष विविध दंत विकार रुग्णांनावर यशस्वी उपचार केले असून अत्याधुनिक पद्धतीने दंत रोपण हे अभ्यासक्रम नुकतेच पूर्ण केले डॉ कानिर भाटिया यांनी मोलाचे मार्गदर्शन केले त्यांच्या हस्ते प्रमाणपत्र स्वीकारले. साईदीप सह्याद्री हॉस्पिटलचे चेअरमन डॉ दीपक एस एस, डॉ आर आर धूत, डॉ रवींद्र सोमाणी, डॉ कैलास झालानी व सर्व जेष्ठ संचालक डॉक्टर्स यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभत असते यांच्या दूरदृष्टी मुळे साईदीपसहायद्री हॉस्पिटल मध्ये अत्याधुनिक दंत विकार विभाग कार्यरत असून डॉ रोहित धूत यांच्या मार्गदर्शनाखाली आता पर्यंत अनेक कृत्रिम दंत रोपण शस्त्रक्रिया पूर्ण केल्या आहेत असे सांगून डॉ पायल धूत यांनी यापुढे या अभ्यासक्रमामुळे आधुनिक पद्धतीने दंत रोपण करण्यास मदत मिळणार आहे.

# सरपंच पोपटराव अंतु वारुळे यांना ऊस लागवडीतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल पुरस्कार प्रदान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** प्रगत शेती आणि वैज्ञानिक पीक पोषण पद्धतींमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करण्याच्या उद्देशाने महाधन ॲग्रीटेक लिमिटेड तर्फे अहिल्यानगर जिल्ह्यातील पोखर्डी तालुक्यातील सरपंच पोपटराव अंतु वारुळे यांना ऊस लागवडीतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रतिष्ठेचा 'महाधन योद्धा पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. नंदनवन लॉन्स, न्यू टिळक रोड, अहिल्यानगर येथे आयोजित सत्कार समारंभात शेतकरी, ग्रामस्थ, कृषी क्षेत्रातील मान्यवर आणि कंपनीचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

महाधन योद्धा पुरस्काराद्वारे संतुलित पीक पोषण, वैज्ञानिक शेती पद्धती आणि कार्यक्षम अन्नद्रव्य व्यवस्थापनाच्या माध्यमातून उल्लेखनीय उत्पादनक्षमता साध्य करणाऱ्या प्रगत शेतकऱ्यांचा गौरव केला जातो. हा सन्मान पीक उत्पादनक्षमता आणि नफा वाढवण्यासाठी आधुनिक पीक पोषण उपाययोजनांचे वाढते महत्त्व अधोरेखित करतो.


महाधन ॲग्रीटेक लिमिटेडच्या, 'महाधन' या प्रमुख ब्रँडअंतर्गत भारतीय शेतकऱ्यांना पिकानुसार पोषण उपाय उपलब्ध करून देण्यात अग्रणी राहिली आहे. प्रगत खत उत्पादने आणि शेतकरी–केंद्रित नवकल्पनांच्या माध्यमातून कंपनी विविध पिके आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या पिकांमध्ये शाश्वत कृषी विकासाला चालना देत आहे. कार्यक्रमात बोलताना पुरस्कार विजेते सरपंच पोपटराव म्हणाले ''महाधनच्या क्रॉपटेक ९:२४:२४ मुळे माझ्या ऊस शेतीत उल्लेखनीय परिणाम मिळाले. उसाची वाढ अधिक मजबूत झाली, जाडी सुधारली, कांड्यामधील अंतर वाढले आणि फुटवे लवकर निघाले तसेच त्यांची वाढ अधिक जोमदार झाली. गाळपयोग्य उसांची संख्या, पिकातील एकसारखेपणा आणि एकूण उत्पादनक्षमता वाढल्याने माझे उत्पन्न वाढले आणि वैज्ञानिक शेती पद्धतीवरील माझा विश्वास अधिक दृढ झाला.''

या सन्मानाबद्दल प्रतिक्रिया देताना महाधन ॲग्रीटेक लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी नरेश देशमुख म्हणाले, ''महाधन योद्धा पुरस्कार हा प्रगत आणि विज्ञानाधारित कृषी पद्धती स्वीकारणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करण्याच्या आमच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. सरपंच पोपटराव वारुळे यांच्यासारखे शेतकरी संतुलित पीक पोषणामुळे उत्पादनक्षमता, नफा आणि शाश्वतता यामध्ये सकारात्मक बदल कसा घडवता येतो, हे दाखवून देतात. महाधनमध्ये आम्ही पिकांच्या गरजेनुसार नाविन्यपूर्ण पोषण उपाय शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यावर सातत्याने भर देत आहोत.''

कंपनीची पिकानुसार विकसित केलेली पोषण उत्पादने विविध जमिनी व पिकांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आली आहेत. क्रॉपटेकसह महाधनची प्रगत उत्पादने मुख्य, दुय्यम आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांचे संतुलित मिश्रण उपलब्ध करून देतात, ज्यामुळे अन्नद्रव्य शोषण व पिकांची कामगिरी सुधारते. अशा उपाययोजनांमुळे शेतकऱ्यांना उत्पादनक्षमता वाढवणे, खतांचा कार्यक्षम वापर करणे आणि पिकांची गुणवत्ते बरोबरच जमिनीचे आरोग्य सुधारणे शक्य झाले आहे. महाधन योद्धा पुरस्काराच्या माध्यमातून महाधन ॲग्रीटेक लिमिटेड आधुनिक कृषी पद्धतींना प्रोत्साहन देण्याबरोबरच ज्ञान, नवकल्पना आणि समर्पणाच्या जोरावर भारतीय शेतीत परिवर्तन घडवणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करत आहे.

# राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ साठी प्रा. महेश मरकड व प्रा. श्रीकांत ढाकणे यांची निवड

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**शेवगाव–** समाजभूषण एकनाथराव ढाकणे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, शेवगाव येथील प्रा. महेश शहाराम मरकड आणि प्रा. श्रीकांत एकनाथराव ढाकणे यांची तर्फे प्रदान करण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ साठी निवड झाली आहे.

प्रा. महेश मरकड हे प्राध्यापक, विभागप्रमुख तसेच प्रशिक्षण व नियुक्ती अधिकारी म्हणून कार्यरत असून विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकास, प्लेसमेंट आणि संशोधन क्षेत्रातील योगदानासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे. तर प्रा. श्रीकांत ढाकणे यांची विद्यार्थीकेंद्रित अध्यापन, उत्कृष्ट संघटन कौशल्य, प्रभावी व्यवस्थापन आणि शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल निवड झाली आहे.

सदर पुरस्कार वितरण सोहळा दि. १४ जून २०२६ रोजी पुणे येथे होणार असून पुरस्कारार्थींना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. या यशाबद्दल संस्थापक अध्यक्ष डॉ. एकनाथराव ढाकणे, कोषाध्यक्ष हृषीकेश ढाकणे, प्राचार्य, प्रा. डॉ. रियाझखान अत्तार, प्रा. डॉ. अंबादास डोंगरे, सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी दोन्ही प्राध्यापकांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## पत्नीची कुऱ्हाडीने हत्या

# गुन्ह्याची कबुली देत आरोपी पती पोलिसांच्या स्वाधीन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** तालुक्यातील नारळा परिसरात बुधवारी सकाळी पत्नीची कुऱ्हाडीने हत्या झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. हत्येनंतर आरोपी पतीने स्वतः हून पोलिस ठाण्यात हजर राहून गुन्ह्याची कबुली दिल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

मंदाबाई सुरेश अंगारखे (वय ४५, रा. गांगलवाडी, नारळा, ता. पैठण) असे मृत महिलेचे नाव आहे. तर सुरेश अंगारखे असे आरोपी पतीचे नाव असून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सुरेश व मंदाबाई अंगारखे हे दाम्पत्य बुधवारी सकाळी संत ज्ञानेश्वर उद्यान परिसरातील झाडझुडपांच्या भागात सरपण गोळा करण्यासाठी गेले होते. यावेळी दोघांमध्ये झालेल्या वादातून सुरेश अंगारखे याने सोबत आणलेल्या कुऱ्हाडीने पत्नीवर वार केले. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या मंदाबाई यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

घटनेनंतर सुरेश अंगारखे थेट पोलिस ठाण्यात पोहोचला. तेथे त्याने पत्नीची हत्या केल्याची माहिती पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला व मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून हत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे नारळा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# संविधान मूल्यांचा जागर; बोल्हेगावात न्याय, समता आणि बंधुतेचा संदेश

## ज्ञानदीप फाऊंडेशन व सीयोन चर्चच्या संयुक्त विद्यमाने संविधान प्रबोधन कार्यक्रम उत्साहात



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** भारतीय संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि धर्मनिरपेक्षता या मूलभूत मूल्यांचा प्रचार–प्रसार करण्यासाठी ज्ञानदीप फाऊंडेशन आणि सीयोन चर्च यांच्या संयुक्त विद्यमाने बोल्हेगाव येथील मोरया पार्क फेज–२ परिसरात संविधान जागर व प्रबोधन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमात फुले–शाहू–आंबेडकरी विचारसरणीचे कार्यकर्ते, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी परिसरात अशोक चक्र असलेला निळा ध्वजाला अभिवादन करण्यात आले. संविधान, सामाजिक समता आणि सर्वधर्मसमभाव या संकल्पनांवर आधारित या कार्यक्रमात विविध मान्यवरांनी आपले विचार मांडले. ज्येष्ठ नेते अशोक गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला नगरसेवक कुमारसिंह वाकळे, कॉ. अनंत लोखंडे, पास्टर प्रशांत चक्रनारायण, फादर अनिल कसबे, सुमेध गायकवाड, ज्ञानदीप फाऊंडेशनचे अध्यक्ष कॉ. पंकज लोखंडे, सुनिल भालेराव, राजेंद्र लोखंडे, माया जाधव, सारिका गागर्डे, ज्योती साठे, जयश्री गायकवाड, लतिका कसबे, प्रियांका साळवे, शारदा गायकवाड, निलेश चक्रनारायण, पास्टर गणेश लावरे, अभिमन्यू साळवे, जावेद सय्यद, दिलशाद अन्सारी, सनी साळवे, आकाश दळवी, प्रा. प्राजक्ता लोखंडे, क्लेरा लोखंडे, नितीन साठे, बाळासाहेब गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना फादर अनिल कसबे यांनी देशातील अल्पसंख्याक समाजाच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले. संविधानाने दिलेल्या अधिकारांचे संरक्षण सर्व घटकांना समानपणे मिळाले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. सामाजिक ऐक्य आणि संविधानिक मूल्यांच्या बळावरच सर्व समाजघटकांना न्याय मिळू शकतो, असे त्यांनी सांगून ख्रिस्ती समाजाला संरक्षणाची गरज त्यांनी व्यक्त केली.

पाहुण्यांचे स्वागत ज्ञानदीप फाऊंडेशनचे अध्यक्ष कॉ. पंकज लोखंडे यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गीतांवर आकर्षक लेझीम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या सांस्कृतिक सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.

नगरसेवक कुमारसिंह वाकळे यांनी भारतीय संविधानाचा मूलभूत संदेश समजून घेण्याचे आवाहन केले. ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण, समता आणि संविधानिक मूल्यांच्या आधारे समाज परिवर्तनाचा मार्ग दाखविला. मात्र आज शिक्षण घेतलेली माणसेही व्यक्तीच्या गुणवत्तेपेक्षा त्याची जात शोधण्याचा प्रयत्न करतात, ही दुर्दैवी बाब आहे. देशाला प्रगतीच्या दिशेने नेण्यासाठी जातीवादाला थारा देता कामा नये. माणुसकी आणि संविधान या दोन मूल्यांच्या आधारे समाज सक्षम होऊ शकतो,'' असे ते म्हणाले.

अशोक गायकवाड यांनी जातीवाद आणि धर्माधारित राजकारणावर कठोर टीका केली. ''प्रत्येक व्यक्तीची जात शोधण्याची प्रवृत्ती ही समाजाला मागे नेणारी आहे. धर्माच्या नावावर राजकारण करणे देशासाठी घातक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देश एकसंघ ठेवण्यासाठी संविधानाची निर्मिती केली. मात्र आज जातीय ध्रुवीकरण वाढवून समाजात फूट पाडण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

# राज्यातील हजारो प्राचीन देवस्थानांवर अन्याय व आघात करणारा असून तात्काळ रद्द करण्यात यावा- अँड.विलास महाजन

## अहिल्यानगर जिल्ह्यातील मंदिर विश्वस्तांची व्यापक बैठक । प्रस्तावित मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** मंदिरांना शेकडो वर्षांपूर्वी समाजहित, धार्मिक परंपरा, नित्य पूजा–अर्चा, उत्सव, अन्नदान, धर्मशाळा, वेदपाठशाळा आणि सामाजिक उपक्रमांसाठी इनामी जमिनी देण्यात आल्या होत्या. या जमिनी केवळ मालमत्ता नसून हिंदू समाजाच्या श्रद्धा, परंपरा आणि धार्मिक व्यवस्थेचा आधार आहेत. प्रस्तावित कायद्यामुळे मंदिरांच्या आर्थिक स्रोतांवर गंभीर परिणाम होऊन अनेक धार्मिक आणि सामाजिक उपक्रम बंद पडण्याचा धोका निर्माण झाला आहे.हा कायदा हिंदू देवस्थानांच्या बाबतीतच हस्तक्षेप करणारा असून धार्मिक समतेच्या तत्त्वालाही बाधा पोहोचवणारा आहे.

महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित केलेला ''मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा'' हा राज्यातील हजारो प्राचीन देवस्थानांवर अन्याय व आघात करणारा असून हिंदू धार्मिक संस्थांच्या स्वायत्ततेवर गदा आणणारा आहे. त्यामुळे हा कायदा संपूर्णतः रद्द करून नवीन तज्ञ समितीमार्फत व्यापक अभ्यासानंतर नवीन प्रारूप तयार करण्यात यावे,अशी ठाम मागणी महाराष्ट्रातील विविध देवस्थानांनी आणि विश्व हिंदू परिषदेतर्फे करण्यात येत आहे.असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे मंदिर,अर्चक,पुरोहित संपर्क आयामाचे पुणे विभाग प्रमुख ॲड.विलास महाजन यांनी केले आहे.



टिळक रोड येथील पटेल मंगल कार्यालयात अहिल्यानगर जिल्ह्यातील मंदिर,विश्वस्त, पुजारी यांच्या बैठकीचे आयोजन विश्व हिंदू परिषद मंदिर,अर्चक ,पुरोहित आयमाच्या वतीने करण्यात आले होते.याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खाकीदास बाबा मठ ट्रस्ट चे अध्यक्ष चंद्रकांत काबरा, अँड.श्रीराम भारदे, ह भ प रामदास क्षीरसागर महाराज, विश्व हिंदू परिषदेचे मंदिर, अर्चक,पुरोहित संपर्क आयामाचे पुणे विभाग प्रमुख ॲड.विलास महाजन,श्री विशाल गणेश देवस्थानचे विश्वस्त पंडितराव खरपुडे आदींच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न झाली.

महाजन पुढे म्हणाले,मंदिर एवं अर्चक पुरोहित संपर्क विभागाच्या वतीने पश्चिम महाराष्ट्र प्रांतात ठिकठिकाणी विविध देवस्थानच्या विश्वस्तांची एकत्र बैठक घेऊन सदर विषयी जागरण करण्याचे काम आज चालू आहे.त्यामध्ये प्रस्तावित कायद्याची माहिती आणि त्यामध्ये असणाऱ्या आवश्यक सुधारणा याबाबत चर्चा केली जाते. सदर उपक्रमास मंदिरांच्या विश्वस्तांचाही उत्तम प्रतिसाद मिळत आहे त्यामुळे अधिकाधिक ठिकाणी सदर विषय पोहोचवणे व मंदिर विश्वस्तांच्या सह्यांचे निवेदन सरकारपर्यंत पोहोचवणे यासाठी परिषद पुढील काळात अधिक क्रियाशील राहणार आहे.

या बैठकीत अँड.श्रीराम भारदे, ह भ प रामदास क्षीरसागर महाराज यांनी मार्गदर्शन केले.

प्रास्ताविकात श्रीकांत नांदापूरकर म्हणाले,मंदिरांच्या मालमत्ता,परंपरा आणि धार्मिक स्वायत्ततेचे संरक्षण करणारी स्पष्ट तरतूद करण्यात यावी.कोणताही निर्णय घेण्यापूर्वी राज्यभरातील देवस्थान, अर्चक, पुजारी आणि हिंदू समाजाशी व्यापक चर्चा करण्यात यावी.हिंदू समाजाच्या भावना लक्षात घेऊन हा प्रस्तावित कायदा आपले हिंदुत्ववादी सरकार मागे घेईल,असा आम्हाला विश्वास आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजेंद्र सोनवणे यांनी केले तर आभार अँड.जयदिप देशपांडे यांनी मानले.

या बैठकीसाठी जिल्हातील मंदिर विश्वस्त पुजारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विश्व हिंदू परिषद मंदिर आर्चक पुरोहित आयामाचे प्रांत टोळी सदस्य अँड.जयदीप देशपांडे,विभाग टोळी सदस्य मिलिंद मोभारकर,गजेंद्र सोनवणे,हरिभाऊ डोळसे,विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा प्रसिद्ध प्रमुख अमोल भांबरकर, मनोहर भाकरे,अरुण खिची,दिनेश परदेशी, अंबादास गोटीपामूल आदींनी परिश्रम घेतले.

# इंटिरियर डिझाईनर असोसिएशनतर्फे ''वर्ल्ड इंटिरियर दिवस'' साजरा




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** इंटिरियर डिझाईनर असोसिएशन, अहिल्यानगर संस्थेच्या सर्व इंटिरियर डिझाईनर्सतर्फे ''वर्ल्ड इंटिरियर दिवस'' (३० मे २०२६) उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त जनकल्याण रक्तपेढी येथे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी सावेडीतील हॉटेल संजोग येथे या समारंभाकरिता पुणे येथील सुप्रसिद्ध इंटिरियर डिझायनर सुधीर पवार यांना विशेषतः आमंत्रित करण्यात आले. अहिल्यानगरमधील नामवंत आर्किटेक प्रल्हाद जोशी या दोघांचाही इंटिरियर वर्क प्रेझेंटेशन आयोजित करण्यात आले होते, कार्यक्रमाच्या सुरवातीला प्रमुख अतिथी यांचे प्रेझेंटेशन झाले व तदनंतर प्रयोजकांचे व्यवसायाबद्दलच्या प्रमुख गोष्टींबद्दल माहिती दिली. यानंतर संस्थेचे सभासदांच्या उपस्थितीत संस्थेचे पदाधिकारी व प्रमुख अतिथी यांनी मिळून वर्ल्ड इंटिरियर दिवसानिमित्त केक कापून साजरा करण्यात आला.

कार्यक्रम स्थळी अहिल्यानगर– इंटिरियर डिझाईनर असोसिएशन संस्थेचे अध्यक्ष सागर कंदूर, सचिव व्रजेश शहा, खजिनदार अंकुर सुपेकर, उपाध्यक्ष उमेश जाजू व संपूर्ण संचालक मंडळ व तसेच इतर सभासद चंद्रकांत तागड, अमोल खोले, चेतन वाडेकर, प्रविण पडवळ, रोहित लोटके,श्वेता मुळे, अलका बलदवा, कल्पना गांधी, सचिन हिवाळे, विशाल मुसळे,प्रल्हाद जोशी, तुषार भांबरे, अजय दगडे, विनायक गोसके, राकेश गांधी, किरण बडवे उपस्थित होते.

या कार्यक्रमाकरिता प्रायोजक म्हणून अरिहंत होम डेकोर , अरिहंत प्लायवूड या दालनाचे संचालक आयुष मुनोत व दिव्यांशु मुनोत यांचे मुख्य सहकार्य लाभले. तदनंतर अध्यक्ष यांनी पुढील काळात होणाऱ्या एड्युकेशनल सिरीज, स्टडी टूर, रक्तदान शिबीर, इतर बरेचसे सामाजिक उपक्रम असोसिएशनच्या माध्यमातून होणार आहेत, याची माहिती दिली, कार्यक्रमअंति संस्थेचे सहसचिव कृणाल बुरगुल यांनी आभार मानले. याशिवाय संस्थेचे अमोल खोले, उमेश जाजू , विशाल दगडे, कृणाल बुरगुल, राहुल बजाज, घनश्याम पित्रोडा, अमित कुकरेजा, सतीश बजाज आदीनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

# शब्दगंध साहित्यिक संमेलनात ॲड. अनुराधा येवले यांना राज्यस्तरीय पुरस्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** सामाजिक, शैक्षणिक आणि जनजागृतीच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ॲड. अनुराधा येवले यांना १७ व्या दोन दिवसीय शब्दगंध साहित्यिक संमेलनात राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते झालेल्या या सन्मान सोहळ्यामुळे संमेलनाला विशेष प्रतिष्ठा लाभली. साहित्य, समाजकारण आणि संस्कृती यांचा सुंदर संगम असलेल्या या कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.

याप्रसंगी शंभराव्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आदरणीय योगेशजी सोमन, प्रमुख पाहुणे आयएएस अधिकारी गुलाबराव खरात, येरवडा कारागृहाचे अधीक्षक इन्स्पेक्टर रेवणजी कानडे, संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. संदीप सांगळे, स्वागताध्यक्ष नगरसेवक सुरेशभाऊ बनसोडे व सौ. बनसोडे, शब्दगंध साहित्य परिषदेचे अध्यक्ष उद्योजक राजेंद्र उदागे, मंत्रिमामा पांडुळे, शर्मिला गोसावी, घोलप मॅडम, स्वाती ठुबे आणि सुनील गोसावी तसेच साहित्यिक, कवी, लेखक आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते ॲड. अनुराधा येवले यांना सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमात बोलताना स्वागत अध्यक्ष नगरसेवक सुरेश बनसोडे म्हणाले, ''समाजातील वंचित, गरजू आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी निःस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करणे ही समाजाची जबाबदारी आहे. ॲड. अनुराधा येवले यांनी सामाजिक बांधिलकी जपत केलेले कार्य प्रेरणादायी असून अशा व्यक्तींच्या कार्यातून समाजाला नवी दिशा मिळते.

# शोषित–वंचितांना न्याय मिळवून देण्यासाठी स्व. शिवाजी कर्डिले यांचा आयुष्यभर संघर्ष – गणेश बनकर

**भाजप ओबीसी मोर्चाकडून स्व. शिवाजी कर्डिले यांना अभिवादन**
**जिल्हाभर आरोग्य शिबिर व वृक्षारोपण अभियान राबविण्याचा निर्धार**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शेतकरी कुटुंबातून आणि अत्यंत सामान्य परिस्थितीतून पुढे येत माजी मंत्री स्व. आ. शिवाजी कर्डिले यांनी समाजकारण व राजकारणात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. सत्तेचा वापर केवळ राजकीय लाभासाठी न करता समाजातील शोषित, वंचित आणि दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करताना राजकारणातील सर्वसामान्यांचे नेतृत्व हरपल्याची भावना मनात दाटून येते, असे मत भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश बनकर यांनी व्यक्त केले.

भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाच्या वतीने माजी मंत्री स्व. आ. शिवाजी कर्डिले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी स्व. कर्डिले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी यश पानमळकर, रोहित भुजबळ, महेश कर्डिले, रविराज निमसे तसेच ओबीसी मोर्चाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

पुढे गणेश बनकर म्हणाले की, स्व. शिवाजी कर्डिले यांनी नेहमीच बेरजेचे राजकारण केले. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन विकासाची वाटचाल करण्यावर त्यांचा भर होता. राजकीय मतभेद बाजूला ठेवून सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी ते सातत्याने संघर्ष करत राहिले. त्यामुळेच ते केवळ राजकीय नेते न राहता जनतेच्या मनातील लोकनेते बनले.

शेतकऱ्यांशी घट्ट नाळ जोडलेले नेतृत्व म्हणून स्व. कर्डिले यांची ओळख होती. ग्रामीण भागातील विकासकामे, सिंचन, पाणी, रस्ते आणि शेतीसंदर्भातील प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. विकासाची फळे शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचावीत, यासाठी त्यांनी अनेक योजना आणि उपक्रम प्रभावीपणे राबविले. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये त्यांच्याबद्दल विशेष आदर आणि आत्मीयता निर्माण झाली होती. स्व. कर्डिले यांचा सामाजिक आणि राजकीय वारसा जतन करण्यासाठी भाजप ओबीसी मोर्चा विविध उपक्रम राबविणार असल्याचेही बनकर यांनी यावेळी सांगितले.

आमदार अक्षय कर्डिले भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग आणि ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष दादासाहेब सोनमाळी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभर सामाजिक, सांस्कृतिक आणि जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन आणि पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण अभियान हाती घेण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. उपस्थितांनी स्व. शिवाजी कर्डिले यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला.

# ग्रीन सिटी अभियानांतर्गत श्रीरामकृष्ण शाळेत उत्साहात वृक्षारोपण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या 'मा. नामदार श्री. राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमे' अंतर्गत 'एक वर्ष एक लाख वृक्ष' या महत्त्वाकांक्षी पर्यावरण संवर्धन उपक्रमाचा भाग म्हणून श्रीरामकृष्ण शाळेच्या परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.
पर्यावरण संरक्षण, हरित परिसर निर्मिती आणि भावी पिढ्यांना स्वच्छ व निरोगी पर्यावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेत एक लाख वृक्ष लागवड व संवर्धनाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. याच उपक्रमांतर्गत श्रीरामकृष्ण शाळेत ८ ते ९ फूट उंचीची ४५ देशी वृक्षांचे रोपण करण्यात आले. या वृक्षांचे संगोपन व संवर्धन करण्याची जबाबदारी शाळा प्रशासनाने स्वीकारली आहे.



यावेळी मनपाचे पहिले महापौर भगवान फुलसौंदर, माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक प्रकाश भागानगरे, संजय चोपडा तसेच ॲड. व इंजि. कैलाश दिघे यांचा शाळेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. ग्रीन सिटी अभियानाचे महापालिका प्रतिनिधी व उद्यान विभाग प्रमुख शशिकांत नजन, प्रा. हर्षल आगळे आणि प्रताप काळे यांचीही विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत, उपाध्यक्ष व शाळा समितीचे अध्यक्ष नंदकुमार झवर, उपाध्यक्ष मोहनलाल मानधना, उपाध्यक्ष राजेश झवर,सचिव डॉ. शरद कोलते, सहसचिव बजरंग दरक, कार्यकारी समिती सदस्य रवींद्र गुजराथी, मधुसूदन सारडा, लक्ष्मीकांत झवर, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मान्यवरांनी आपल्या मनोगतात वृक्षारोपणाचे महत्त्व अधोरेखित करत प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन केले. ''एक वृक्ष म्हणजे एक जीवन'' हा संदेश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

ग्रीन सिटी अभियानात अधिकाधिक युवक, महिला मंडळे, संस्था, संघटना, कंपन्या, उद्योजक आणि विविध आस्थापनांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन ग्रीन सिटी मोहिमेचे कोअर कमिटी सदस्य ॲड. व इंजि. कैलाश दिघे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थितांनी लावलेल्या वृक्षांचे संवर्धन करण्याचा संकल्प केला. पर्यावरण संवर्धनासाठी भविष्यातही अशा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचा निर्धार शाळा प्रशासनाने व्यक्त केला.

बाजारपेठ अधोगती कडे....

# चोवीस तास वीज पुरवठा खंडित राहत असेल तर बाजारपेठेला कायमचे कुलूप लावायचे का ? – किरण काळेंचा सवाल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** काही क्षणांसाठी अवकाळी पाऊस, वादळ सुटलं. परंतु अवघ्या काही मिनिटांमध्ये संपूर्ण शहराची वीज यंत्रणा मृत होऊन पडली. शहराच्या अनेक भागांमध्ये बारा ते चौदा तास वीज नव्हती. कहर म्हणजे शहराचा आत्मा असणाऱ्या बाजारपेठेत तर तब्बल चोवीस तास वीज पुरवठा खंडित होता. त्यानंतरही विजेचा लपंडाव सतत सुरूच आहे. काही लोकांना बाजारपेठेला कायमचे कुलूप लावायचं आहे का, असा संतप्त सवाल ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केला आहे.
थोड्या वेळासाठी झालेल्या पावसाने संपूर्ण वीज पुरवठा यंत्रणात कोलमडून पडल्यानंतर ठाकरे शिवसेनेने यावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. काळे म्हणाले, बाजारपेठेसह शहर अधोगतिकडे चालले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून माळीवाडा बस स्टँड ते सर्जे पुरा हा बाजारपेठेचा मुख्य रस्ता गायब झाला आहे. मध्यवर्ती शहरातील काही रस्ते खोदून तीन–चार महिने लोटले तरी देखील अद्याप पर्यंत काम पुढे सरकायला तयार नाही. जाणून बुजून बाजारपेठेतील कामे रखडवली जात आहेत. प्रश्नांचा गुंता तयार केला जात आहे. प्रशासन नेमके करते तरी काय ? जाणीवपूर्वक बाजारपेठेला वेठीस धरण्याचा कुणाचा डाव आहे काय ? असं सवाल काळेंनी केला आहे.

**काहींच बाजारपेठ उध्वस्त करण्याचं षडयंत्र :**

शहराच्या उपनगरांमध्ये मोक्याच्या ठिकाणी राजकीय नेतृत्वाच्या भागीदारीतून मर्जीतल्या बिल्डरांचे काही प्रकल्प, मॉल नियम धाब्यावर बसवून उभे राहत आहेत. शहराची बाजारपेठ उध्वस्त झाल्या शिवाय त्यांच्या गाळ्यांना गिऱ्हाईक मिळणार नाहीत. म्हणून अनेक दशकांची परंपरा असणारी ऐतिहासिक मूळ बाजारपेठ उध्वस्त करण्याचा षडयंत्र काही राजकीय मंडळींच्या आशीर्वादाने राबविल जात असल्याचा गंभीर आरोप किरण काळे यांनी केला आहे.



**वीज, रस्त्याचा प्रश्न मार्गी लावा :**

विजेचा लपंडाव थांबला पाहिजे. पावसाळा सुरू होत आहे. दर शनिवारी बाजारपेठेसह शहरामध्ये महावितरण शट डाऊन घेत असते. या काळात मग नेमका कोणता मेंटेनन्स केला जातो ? मेन्टेनन्स होऊन देखील लाईट गेल्यावर ती तात्काळ पूर्वत का होत नाही ? हे थांबणार नसेल तर महावितरण प्रशासनाचे विरोधात ठाकरे शिवसेना तीव्र आंदोलन छडील असा इशारा किरण काळे यांनी दिला आहे. काही भाजप पदाधिकाऱ्यांनी महावितरणच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली होती. त्याचा धागा पकडत काळे म्हणाले, भाजपने हे त्यांच्या नेत्यांना, महायुतीच्या लोकप्रतिनिधींना सांगावे. जे लोक अर्थपूर्ण स्वार्थासाठी पडद्या अडून बाजारपेठेला वेठीस धरतात त्यांचेच कार्यकर्ते लोकांचा कळवळा असल्याचा खोटा आव आणतात, असा टोला काळेंनी लगावला आहे.

(पान १ वरून)

# हमाल पंचायतची बदनामी करणाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करा

व पदाधिकाऱ्यांची बदनामी केल्याचे निवेदनात म्हटले आहे.

पतसंस्थेच्या कामकाजाबाबत स्पष्टीकरण देताना संघटनेने नमूद केले की, पतसंस्था केवळ सभासद असलेल्या माथाडी कामगारांच्या वेतनातून कर्जहप्ते व ठेव रक्कम कपात करते. अशोक सानप हे पतसंस्थेचे सभासद नसल्यामुळे त्यांच्याकडून कोणतीही ठेव अथवा इतर रक्कम वसूल करण्याबाबत संस्थेने अ.नगर माथाडी कामगार मंडळाकडे कधीही मागणी केलेली नाही. त्यामुळे त्यांचे आरोप वस्तुस्थितीविरुद्ध असल्याचा दावा संघटनेने केला आहे.

संघटनेचा संपूर्ण कारभार शासकीय नियमांनुसार व पारदर्शक पद्धतीने चालविला जात असल्यामुळे संघटनेच्या कामकाजाविषयी आजपर्यंत कोणत्याही हमाल, मापाडी अथवा कामगाराने तक्रार केलेली नाही, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. कामगारांच्या हितासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविले जात असून संघटनेच्या कामकाजावर सर्व संबंधित विभागांचे नियंत्रण असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीकडून परवाना नूतनीकरणासाठी हमाल पंचायतकडून अडथळे निर्माण केले जात असल्याचा आरोपही अशोक सानप यांनी केला असल्याचे निवेदनात म्हटले आहे. मात्र बाजार समितीच्या परवाना नूतनीकरण प्रक्रियेशी हमाल पंचायतचा कोणताही संबंध नसताना संघटनेची जाणीवपूर्वक बदनामी करण्यासाठी असे आरोप करण्यात आल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. त्यामुळे संबंधित आरोपांची चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनात आणखी एक गंभीर आरोप करण्यात आला असून अशोक सानप यांचे वडील किसन लिंबाजी सानप यांनी गेल्या चार वर्षांपासून कोणत्याही आस्थापनेवर प्रत्यक्ष काम केले नसतानाही माथाडी कामगार मंडळाकडे बोगस मजुरीचा भरणा करून संघटनेच्या श्रमिक हॉस्पिटलमधील विविध लाभ घेतल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांनी संघटना व माथाडी कामगार मंडळाची फसवणूक केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, अशोक सानप व किसन सानप हे काही दिवसांपासून संघटनेची प्रतिमा मलीन करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत असून विविध माध्यमांद्वारे बिनबुडाचे आरोप प्रसारित करीत आहेत. तसेच शासनाकडे वारंवार तक्रारी अर्ज सादर करून खोटी माहिती देत संघटनेला वेठीस धरण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी जिल्हा हमाल पंचायतचे जिल्हाध्यक्ष अविनाश घुले यांनी सांगितले की, अ.नगर जिल्हा हमाल पंचायत ही अनेक दशकांपासून हमाल, मापाडी व कष्टकरी कामगारांच्या हितासाठी कार्यरत आहे. हजारो कामगारांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे तसेच सामाजिक सुरक्षा योजनांशी जोडणे यासाठी संघटना सातत्याने प्रयत्नशील आहे. अशा परिस्थितीत कोणताही पुरावा नसताना संघटनेवर व पदाधिकाऱ्यांवर आरोप करून बदनामी करण्याचा प्रयत्न हा अत्यंत गंभीर प्रकार आहे. घुले पुढे म्हणाले की, संघटनेचे कामकाज पूर्णपणे पारदर्शक असून प्रत्येक आर्थिक व्यवहार कायदेशीर चौकटीत केला जातो. वैयक्तिक आकसातून किंवा संघटनेविषयी द्वेषभावना ठेवून कोणीही चुकीची माहिती पसरवत असेल तर त्याविरोधात कायदेशीर मार्गाने कठोर कारवाई केली जाईल. कामगारांच्या विश्वासावर उभी असलेली संघटना कोणत्याही परिस्थितीत बदनाम होऊ देणार नसून प्रशासनानेही या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. दरम्यान, अशोक किसन सानप व किसन लिंबाजी सानप यांच्याविरोधात तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करावा, अन्यथा १० जून २०२६ पासून पुढील आंदोलनात्मक भूमिका जाहीर करण्यात येईल, असा इशाराही अ.नगर जिल्हा हमाल पंचायतच्या वतीने प्रशासनाला देण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे आता जिल्हा प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे कामगार संघटनांचे लक्ष लागले आहे.

# अवैध दारू विक्रेत्यांच्या १० जामीनदारांच्या सातबारावर प्रत्येकी एक लाखाचा बोजा

जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे व डीवायएसपी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. ठेंगे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. तर पीएसआय गणेश वाघमारे, समाधान फडोळ, राजेंद्र जाधव आणि पोलीस अंमलदारांच्या पथकाने या कारवाईचा यशस्वी पाठपुरावा केला.

**कारवाई झालेले आरोपी व जामीनदारांची नावे**

कैलास कुसमुडे (जामीनदार सतीश ढवळे, वांबोरी) मोहन बोरुडे (जामीनदार काशिनाथ ढवान, कुरणवाडी) दिलीप कुसमुडे (जामीनदार सचिन गडाख, वांबोरी) काशिनाथ चव्हाण (जामीनदार जनार्दन हिवाळे, कोंढवड) दीपक पडघलमल (जामीनदार नवनाथ पिंपळे, सात्रळ) नितीन मुंतुडे (जामीनदार संदीप कोळसे, गढदे आखाडा) नवनाथ वाघ (जामीनदार अनिता पाटील, राहुरी) जनार्दन पवार (जामीनदार नीरज मेहेत्रे, मानोरी) माणिक पवार (जामीनदार राजेंद्र पवार, मानोरी) अशोक गुंजाळ (जामीनदार सुरेश साळुंके, गांधीवाडी)

# पैठणमध्ये १७ वर्षीय युवकाचा खून; नगरसेवकासह तिघांविरुद्ध ॲट्रॉसिटीसह गुन्हा

अनमोलच्या छातीवर व पोटात वार केल्याचा आरोप आहे. गंभीर जखमी झालेल्या अनमोलचा मृत्यू झाला.

या प्रकरणी पैठण पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १०३(१), ४९, ५४, ५५, ६०(अ) तसेच अनुसूचित जाती–जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ अंतर्गत विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक एम. बी. गोमारे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील पाटील करीत आहेत. दरम्यान, न्यायालयीन नोंदीनुसार आरोपींविरुद्ध यापूर्वी कोणताही गुन्हा दाखल नसल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या घटनेमुळे इंदिरानगर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

# वेदमूर्ती देवव्रत रेखे यांना पुण्याचा ब्राह्मणभूषण पुरस्कार

सर्वश्री अपर्णा रामतीर्थकर (२०१३), अ. भा. गोविंद कुलकर्णी (२०१४), ब्राह्मण महासंघाचे एअरमार्शल भूषण गोखले (२०१५), शारदा पीठाचे पं. वसंतराव गाडगीळ (२०१६), पितांबरीचे रविंद्र प्रभुदेसाई (२०१७), श्री सद्गुरू ग्रुपचे यशवंत कुलकर्णी (२०१८), प्रवचनकार डॉ. सच्चिदानंद शेवडे (२०१९), ज्येष्ठ अभिनेते शरद पोंक्षे (२०२२), ज्येष्ठ अभिनेते प्रशांत दामले (२०२३), ॲनलायझरचे पत्रकार सुशील कुलकर्णी (२०२४), पंचांगकर्ते मोहनराव दाते (२०२५) यांना गौरविण्यात आले आहे. तसेच यापूर्वी 'इंदुमती वसंत करिअर भूषण' पुरस्कार सामाजिक कार्यकर्ते सारंग गोसावी, लेखक घनःश्यामपाटील, सिनेदिग्दर्शक दिग्पाल लांजेकर, पत्रकार डॉ. सागर देशपांडे, योगगुरू सौ. मनाली देव, उद्योजक निर्मल देशपांडे यांना प्रदान करण्यात आला होता. यापूर्वी युवा कीर्तनकार पुरस्कार सौ. मानसी बडवे, सौ. संज्योत केतकर, सौ. किरण कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला होता, तर भगवान परशुराम ब्राह्मण संस्था पुरस्कार महाराष्ट्र ब्राह्मण सभा, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था, श्री शुक्ल यजुःशाखीय माध्यंदिन महाराष्ट्रीय ब्राह्मण सभा या संस्थांना प्रदान करण्यात आला.